## <u>निशाणी ५, १६ व ३१ वरील आदेश</u>
## ( दत्तात्रय पवार वि. आनंदा वाईकर वगैरे )

१. प्रस्तुत कामी वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १, २ अन्वये अर्ज दाखल करण्यात आलेला असुन त्यायोगे दावेचे अंतिम निर्णयापावेतो प्रतिवादी अगर अन्य इसंमार्फत वादीचे दावा मिळकतीत असणारे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु नये तसेच दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे गैरहक्की बांधकाम करु नये व दावा मिळकतीमधुन प्रतिवादीस हुसकावून लावू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश होणेकरीता विनंती केलेली आहे.

त्याचप्रमाणे निशाणी १६ व निशाणी ३१ लगत अर्ज दाखल करुन निशाणी ५ लगत दाखल असणाऱ्या अर्जावर निर्णय होईपर्यंत 'जैसे थे' हुकूम ठेवणेबाबत विनंती केलेली आहे.

२. वादीचे अर्जातील थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे :

मौजे शिरसगांव, ता.कडेगांव, जि.सांगली येथील वादीचे ग्रामपंचायत मिळकत नं.४०४ या घर मिळकतीच्या दक्षिणेस व प्रतिवादीचे पश्चिमेस असणारी ९४ फुट लांब व २४ फुट रुंद ही खुली जागा (सदर मिळकतीस साईकरीता 'वादमिळकत' असे संबोधण्यात आले आहे) ही वादीचे चुलते शंकर लक्ष्मण पवार यांचे मालकी हक्कवहिवाटीची जागा असुन शंकर लक्ष्मण पवार हे दिनांक ०८/०८/२००४ रोजी मयत झालेले आहेत. शंकर याचा मुलगा खंडेराव हा देखील निपुत्रिक मयत झालेला असुन शंकर याचे सर्व मुलींचा विवाह होवून त्या त्यांचे सासरी असतात व उज्वला ही मतिमंद असलेने वादी तिचा सांभाळ करत आहे. वाद मिळकत ही वादीची व वादीचे पुर्वहक्कदार यांची मालकीहक्क कब्जेवहिवाटीची मिळकत असुन त्याचेशी

प्रतिवादीचा कोणताही हक्कसंबंध नाही. असे असताना प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये ५फुट पुर्व-पश्चिम व १० दक्षिण-उत्तर अशा जागेत बांधकाम करणेकरीता पाया खणुन आखणी सुरु केलेली असलेमुळे वादीने सदरचा दावा दाखल करुन प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश होणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं.१, ३ ते ५ तर्फे निशाणी ३३ लगत म्हणणे व कैफियत सादर केलेली असुन वादीचे अर्जातील कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेला आहे.

प्रतिवादीचे मते, वादीचे पुर्वहक्कदार शंकर लक्ष्मण पवार हा बराचकाळ ग्रामपंचायत सदस्य असलेने आपल्या अधिकारांचा गैरवापर करुन त्याने प्रतिवादीचे अपरोक्ष २४ X ९० या क्षेत्राला लबाडीने नोंद करुन घेवुन त्यास पुर्वीचा ग्रामपंचायत मिळकत नं.२३५ व हल्लीचा ग्रामपंचायत मिळकत नं.२४८ असा दिला. ही मिळकत वास्तवीकपणे अस्तित्वात नसुन काल्पनिक आहे.

प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीने वाद विषय म्हणुन नमुद केलेली मिळकत ही प्रतिवादी यांचे रहाते घरापुढील मिळकतीचा भाग आहे. प्रतिवादी यांचे राहते घराच्या मिळकतीचा ग्रामपंचायत मिळकत नं.६२ व घरापुढील खुल्या जागेचा ग्रामपंचायत मिळकत नं.२६२ असा होता. प्रतिवादी यांचे पुर्वीचे ग्रामपंचायत मिळकत नं.६२ व ग्रामपंचायत मिळकत नं.२६२ यांची पुर्वपश्चिम ९० फुट व दक्षिणउत्तर ९० फुट अशी मोजमापे होती. वादी यांचे राहते घराचा पुर्वीचा ग्रामपंचायत मिळकत नं.३५ असुन सदर मिळकत ही प्रतिवादीचे ग्रामपंचायत मिळकत नं.६२ व ग्रामपंचायत मिळकत नं.२६२ या क्षेत्राच्या उत्तर बाजुस वायव्य कोपऱ्यात असुन त्याचा वापर वादी उत्तरेकडून करतात. या मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणताही हक्क

संबंध नव्हता व नाही.

प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीचे पुर्वहक्कदार यांनी यापुर्वी देखील या वादातीत क्षेत्रावर त्यांची मालकी सांगून वहिवाटीस हरकत करणेची भाषा सुरु केली म्हणुन प्रतिवादीचे पुर्वहक्कदारांनी वादीचे पुर्वहक्कदारांविरुध्द विटा येथील न्यायालयात रे.दि.मु.नं.१५७/१९९० हा दावा दाखल केलेला होता. सदर दावेचे कामी झालेलया निकालाविरुध्द जिल्हा न्यायालय सांगली रे.दि.अपिल नं.१०५/२००२ दाखल झालेले होते. सदरचे अपिल निर्णयीत होवून सदर वादातीत क्षेत्र हे या दाव्यातील प्रतिवादीचे पर्वहक्कदार यांचे  मालकीवहिवाटीचे आहे व त्यास वादीचे पुर्वहक्कदारांनी हरकत व अडथळा करु नये असा आदेश पारीत करणेत आलेला असुन तो आजतागायत अस्तित्वात आहे. प्रतिवादी हे त्याचे मालकीहक्क वहिवाटीचे क्षेत्रात बांधकाम करत असुन त्याचेशी प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही. वादीने सदर कामी महत्वाच्या बाबी लपवुन ठेवून तुर्तातुर्त मनाई आदेश होणेबाबत विनंती केलेली आहे. अशी परिस्थितीमध्ये वादीचा दावा चालणेस पात्र नाही असे कथन करुन प्रतिवादीने वादीचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

**४.** वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांनी निशाणी ५, १६ व ३१ लगत दाखल केलेले अर्जावर एकत्रात युक्तीवाद केलेला असलेमुळे आजरोजी सदर अर्ज एकत्रात निर्णयीत करत आहे.

**५.** वादी व प्रतिवादींचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांची कथने विचारात घेता माझ्या समोर पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीला प्रथमदर्शनी संयुक्तिक बाजु असल्याची बाब सिध्द झालेली आहे का ? | नकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ? | नकारार्थी |
| ३ | सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | नकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता -**

**६.** वादीचे मते, वादीने सदरकामी वादविषय मिळकत म्हणुन मौजे शिरसगांव, ता.कडेगांव, जि.सांगली येथील वादीचे ग्रामपंचायत मिळकत नं.४४० ची राहते घर मिळकतीच्या उत्तरेस असणारी ९४ फुट लांबीची व २४ फुट रुंदीचे खुली जागा चतुःसिमा नमुद करुन नोंद केलेली आहे. तथापी सदर खुल्या क्षेत्राचा मिळकत नंबर वादीने कोठेही नमुद केलेला नाही. तसेच या मिळकतीबाबतचा कोणताही नकाशा या कामी हजर केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये वाद मिळकत म्हणुन नमुद केलेली मिळकत ही विना नंबरची असलेमुळे नेमक्या कोणत्या मिळकती विषयी वादी दाद मागत आहे याबाबत कोठेही स्पष्टता दिसुन येत नाही.

**७.** वादीने वाद मिळकत ही त्यांचे पुर्वहक्कदार व त्यांचे मालकी वहिवाटीची मिळकत आहे असे कथन केलेले आहे. परंतू ही मिळकत वादीस कोणत्या अधिकाराद्वारे मालकी हक्काने प्राप्त झालेली आहे हे कोठेही स्पष्ट केलेले नाही. वादीने त्याचे अर्जामध्ये सदर मिळकत ही त्याचे चुलते शंकर लक्ष्मण पवार यांचे मालकी वहिवाटीची मिळकत आहे व शंकर लक्ष्मण पवार हे

दिनांक ०८/०८/२००४ रोजी मयत झालेले आहेत. तसेच शंकर लक्ष्मण पवार याचा मुलगा खंडेराव हा देखील निपुत्रिक मयत झालेला आहे व शंकर लक्ष्मण पवार याचे मुलींचे विवाह झालेले असुन त्या सासरी नांदत आहे व उज्वला या मतिमंद मुलीचा सांभाळ वादी करत आहेत असे कथन केलेले आहे.

वादीच्या या कथनांवरुन मयत शंकर लक्ष्मण पवार यास असणाऱ्या मुली या त्याचे सरळ वारस म्हणुन अस्तित्वात असलेचे प्रथम दर्शनी दिसुन येते. अशा परिस्थितीमध्ये वादीस वादमिळकतीबाबत कशा प्रकारे मालकी हक्क प्राप्त झालेला आहे हे स्पष्ट केलेले नाही.

वादीने सदरचा दावा हा स्वतःच्या नावे दाखल केलेला आहे. तसेच सदर दावेचे कामी शंकर लक्ष्मण पवार यांचे कायदेशीर सदर वारसास पक्षकार केलेले नाही, अथवा सदरचा दावा हा मतिमंद उज्वला हीचा इष्ट मित्र (next friend) म्हणुन अगर शंकर याचे अन्य विवाहीत मुलींचा वटमुखत्यारधारक म्हणुन दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये वादीस सदरचा दावा दाखल करणेचा अधिकार कशाप्रकारे प्राप्त झालेला आहे हे देखील वादीने स्पष्ट केलेले नाही.

८. प्रस्तुत कामी प्रतिवादीने निशाणी २६ व २७ लगत रे.दि.मु.नं.१५७/१९९० या कामातील हुकूमनामा व न्यायनिर्णय हजर केलेला आहे. त्याचप्रमाणे निशाणी २८ व २९ लगत रे.दि.अपील नं.१०५/२००२ या कामातील हुकूमनामा व न्यायनिर्णय हजर केलेला आहे. या सर्व कागदपत्रांचे वाचन केले असता, सदर दावा व अपील हे वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदर यांचे दरम्यान वाद मिळकतीसंदर्भात दाखल झालेले होते हे स्पष्ट होते तसेच वाद मिळकतीबाबत मा.जिल्हा न्यायालय सांगली यांचा आदेश अस्तित्वात असुन सदर मिळकत ही

प्रतिवादी यांचे मालकीवहिवाटीची मिळकत असलेचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. सदरचा आदेश रद्दबादल झालेबाबतचा कोणताही पुरावा याकामी वादीने दाखल केलेला नाही अथवा सदर आदेशानंतर वादमिळकत ही कायदेशीर हक्काने वादीचे मालकी वहिवाटीस आलेली आहे याबाबतचा देखील कोणताही पुरावा सादर केलेला नाही. अशाा परिस्थितीमध्ये वादमिळकत ही प्रतिवादी यांचे मालकीहक्क वहिवाटीची मिळकत असलेचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी कथन करत आहे त्याप्रमाणे प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत केलेस प्रतिवादीचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट वादीने वादमिळकतीमध्ये त्यास कायदेशीर हक्क असलेची बाब प्रथम दर्शनी निदर्शनास आणून दिलेली नसलेमुळे दावेची संयुक्तीक बाजु व न्यायाचा समतोल वादीचे बाजुने दिसुन येत नाही. सबब मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**मुद्दा क्र.४ करीता -**

**९.** मुद्दा क्र.४ करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी ५, १६ व ३१ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(आदेश १२.४५ वाजता खुल्या न्यायालयात घोषीत)

Sd/-

**( दुर्गा भ. सुतार)**

दि. २०/०४/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव